# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


६०) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६.०९.२०२५

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (१९/०९/२०२५ ते २५/०९/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२७/०९/२०२५ ते ०१/१०/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | दिनांक | २७ | २८ | २९ | ३० | ०१ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ९ | २० | १६ | ९ | ८ |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३२ | ३२ | ३१ | ३० | ३० |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २३ | २४ | २४ | २४ | २४ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ७ | ८ | ८ | ७ | ७ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९५ | ९५ | ९५ | ९९ | ९८ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६५ | ६५ | ७८ | ८२ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १६ | १८ | ७ | ७ | ८ |

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **तसेच पुढील तीन दिवस काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे, तद्नंतर हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल अ‍ॅपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल अ‍ॅपचा वापर करावा. |
| संदेश | | **पावसाची शक्यता असल्याने कीटकनाशक/ बुरशीनाशक फवारणी करणे टाळावे तसेच पिकांना खत देणे ई. कामे टाळावीत.** |
| मूग, उडीद | साठवणूक | काढणी केलेले पीक सुरक्षीत ठिकाणी प्लास्टिक कागदाने झाकून ठेवावे. |
| भुईमुग | पक्वतेचची अवस्था | भुइमुगाचा पाला पिवळा दिसू लागल्यावर आणि शेंगाचे टरफल टणक बनून आतल्या बाजूने काळसर दिसू लागताच काढणी करावी व सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी. |
| कापूस | फुलोरा ते बोंड वाढीची | जमिनीतील ओलावा टिकून ठेवण्यासाठी आंतरमशागतीची कामे आणि तण नियंत्रणासाठी कोळपणी, खुरपणी किंवा तणनाशकाचा वापर करावा. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत. मावा, तुडतुडे इत्यादी रस शोषणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क टक्के किवा अझाडिरेक्टीन ३०० पीपीएम ५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात हवामान कोरडे असताना फवारणी करावी. |
| तुर | फांद्या वाढीची | पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव दिसल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५ टक्के किवा अझाडिरेक्टीन ३०० पीपीएम ५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात हवामान कोरडे असताना फवारावे. |
| मका | कणसे वाढीची अवस्था | मागील काही दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे, त्याकरीता खालीलप्रमाणे फवारणी करावी.<br>१) अळीच्या वाढीच्या लवकरच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निमअर्क १५०० पीपीएम ५ मिली किंवा निंबोळी अर्क ५% यांची प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>२) क्लोरँट्रनिलीप्रोल १८.५% एस सी ४० जी.ए.आय./ हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी ८ ग्रॅम प्रति लि. या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>३) स्पिनेटोरम ११.७ एस. सी. या कीटकनाशकाची ०.५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा<br>४) इमामेक्टीन ५% + बेन्झोएट ल्युफेनुरॉन ४०% डब्लू.जी.०.२ ग्रॅम किंवा नोव्हालुरॉन ५.२५% + इमामेक्टीन बेंझोएट ०.९% एस सी ३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.<br>**(पाऊसाचा अंदाज/ उघडीप पाहूनच फावरणी करावी.)** |
| कांदा | लागवड | रांगडा हंगामासाठी ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात बी पेरून रोपांची पुर्नलागवड ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात करावी. एक एकर कांदा लागवडीसाठी दोन गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी. एक एकर लागवडीसाठी दोन ते तीन किलो बी पुरेसे होते. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझिम हे बुरशीनाशक चोळावे. पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरिडी वापरून जमिनीत मिसळावे. |
| **लिंबू वर्गीय फळझाडे** | | पाने खाणाऱ्या अळया हाताने गोळा अळया गोळा करून नष्ट कराव्यात.<br>प्रदुर्भावाच्या सुरवातीस ५% निंबोळी अर्क म्हणजे ५०० ग्रॅम निंबोळी पावडर अधिक वॉशिंग पावडर @ १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>जर प्रादुर्भाव अधिक असेल तर क्विनालफॉस २५ ईसी @ ३० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>**(पाऊसाचा अंदाज/ उघडीप पाहूनच फावरणी करावी.)** |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २६.०९.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**